BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)

An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research

Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

भारतीय अर्थव्यवस्था आणि ग्रामीण कृषी जीवनशैलीचा भाषीक, मनोवैज्ञानिक अभ्यास

चव्हाण मनोज उकंडराव मराठी

स्व राजकमलजी भारती महाविद्यालय आर्णी

सारांश:-

विश्वाच्या कल्याणासाठी अर्थ महत्वाचा आहे. अर्थ केवळ पैसा नाही. अर्थ म्हणजे वेळेचे नियोजन आहे. जगाच्या पाठीवर अनेक विकसित देश आहे. त्याहून अधिक पटीने विकसनशील देश आहे. वेळेचे नियोजन करून अर्थ प्राप्त केले जात असेल तो देश विकसित होतो. विश्व कल्याणासाठी जागतिक अर्थव्यवस्था महत्वाची भूमिका बजावत आहे. विकसनशील देशांसाठी ही अर्थव्यवस्था अत्यंत आवश्यक आहे. जागतिक स्तरावर आर्थिक दृष्टीने सक्षम होण्यासाठी अर्थविषयक विचार, मार्गदर्शन महत्वपूर्ण ठरतात. त्यासाठी विविध आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय परिषद आयोजित केले जात असेल तर ते नक्कीच स्वागतार्ह आहे.

भारताच्या कल्याणासाठी ही सर्वसमावेशक देशाची अर्थव्यवस्था समजून घेण्यासाठी भक्कम आधार आहे. भारत हा कृषिप्रधान देश आहे. विकसित देशांत भारताचे नाव सुवर्णाक्षरांनी लिहिले जाणार आहे. 'विकसित भारत 2047' हा संकल्प भारताचा सर्वहिताय सर्वसुखाय प्रेरणा देणारा आहे. प्रस्तुत संकल्पाच्या प्रेरणा पूर्तीसाठी "भारतीय अर्थव्यवस्था आणि ग्रामीण कृषी जीवनशैलीचा भाषीक, मनोवैज्ञानिक अभ्यास" या विषयावर लघुशोधनिबंध सादर करीत आहे.

Keywords: भारतीय अर्थव्यवस्था, ग्रामीण कृषी जीवनशैली, ग्रामीण भाषा मनोवैज्ञानिक अभ्यास

प्रस्तावना:-

विश्वाच्या कल्याणासाठी अर्थ महत्वाचा आहे. अर्थ केवळ पैसा नाही. अर्थ म्हणजे वेळेचे नियोजन आहे. जगाच्या पाठीवर अनेक विकसित देश आहे. त्याहून अधिक पटीने विकसनशील देश आहे. वेळेचे नियोजन करून अर्थ प्राप्त केले जात असेल तो देश विकसित होतो. विश्व कल्याणासाठी जागतिक अर्थव्यवस्था महत्वाची भूमिका बजावत आहे. विकसनशील देशांसाठी ही अर्थव्यवस्था अत्यंत आवश्यक आहे. जागतिक स्तरावर आर्थिक दृष्टीने सक्षम होण्यासाठी अर्थविषयक विचार, मार्गदर्शन महत्वपूर्ण ठरतात. त्यासाठी विविध आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय परिषद आयोजित केले जात असेल तर ते नक्कीच स्वागतार्ह आहे.

भारताच्या कल्याणासाठी ही सर्वसमावेशक देशाची अर्थव्यवस्था समजून घेण्यासाठी भक्कम आधार आहे. भारत हा कृषिप्रधान देश आहे. विकसित देशांत भारताचे नाव सुवर्णाक्षरांनी लिहिले जाणार आहे. 'विकसित भारत 2047' हा संकल्प भारताचा सर्वहिताय सर्वसुखाय प्रेरणा देणारा आहे. भारत हा कृषिप्रधान देश आहे.या वाक्याचा प्राथमिक शिक्षणापासून भाषेतून मनोवैज्ञानिक दृष्टीने अभ्यास करत आलो आहे.

कृषी जीवनशैली ग्रामीण जीवनाचा आनंद आणि आधार आहे.भारतीय अर्थव्यवस्था समृद्ध करण्याचा पाया आहे. ग्रामीण कृषी जीवनशैलीचा सुंदर आविष्कार आहे. लाखों लाखों गावं मिळून मजबूत भारत बनलेला आहे. भाषा,साहित्य,

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

संस्कृती,समाज इतिहास आदि दृष्टीने मनोवैज्ञानिक दर्शन घडवणारा देश आहे. कृषी जीवनशैलीचा भाषीक व मनोवैज्ञानिक अभ्यास करायला लावणारा देश आहे.

जगाच्या नकाशावर बुलेट ट्रेनसारखी वेग धरणारी भारताची अर्थव्यवस्था आहे. देशातील भौतिक प्रगती व आधारभूत विकासाचा आधार भारताची अर्थव्यवस्था आहे. सामाजिक- सांस्कृतिक, राजकीय-धार्मिक, शैक्षणिक -आध्यात्मिक, भाषीक साहित्यिक प्रगतीसाठी भारतीय अर्थव्यवस्था आवश्यक आहे. अतिशय वेगाने, अभ्यासपूर्ण पद्धतीने भारतीय अर्थव्यवस्था विकास पावत आहे. 7.8 हा भारताचा विकासदर नवीन ओळख निर्माण करणारा आहे. ती वेळ दूर नाही. जिथे भारत कृषीप्रधान देश नाही तर भारत विकसित देश असे लिहिले जाणार आहे. श्रम हा राष्ट्र सुखाचा आधार आहे. जगातील सर्वात जास्त युवा देश म्हणून भारत ओळखला जातो. ही माझ्या देशाची ताकद आहे. जगातील विविध देशांमध्ये भारतीय स्वतः च्या क्षमतांचा विकास करत आहे. श्रम करत आहे. देशाला विकसित करण्यासाठी कटिबद्ध आहे. विविध व्यवस्थापन आणि आस्थापनांमध्ये योगदान देत आहे. भारताने विविध क्षेत्रातील सहभागाने मानवतेचे दर्शन घडविले आहे. मजबूत भारतीय अर्थव्यवस्था म्हणून ओळख प्राप्त केली आहे. ज्यामध्ये ग्रामीण कृषी जीवनशैलीचा अनमोल योगदान आहे. महाराष्ट्र शासनाच्या विदर्भ इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अँड ह्युमॅनिटीज, अमरावती (महाराष्ट्र, भारत) या स्वायत्त संस्थेच्या अर्थशास्त्र पदव्युत्तर विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC) यांच्या संयुक्त विद्यमाने "भारतीय अर्थव्यवस्था परिवर्तनाच्या टप्प्यावर: विकास, नवोपक्रम, सर्वसमावेशकता आणि शाश्वत विकास" या विषयावर एका बहुविद्याशाखीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. "कृषी, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि कृषी क्षेत्रातील परिवर्तन" (sub theme) अंतर्गत मी लघु शोधनिबंधसाठी "भारतीय अर्थव्यवस्था आणि ग्रामीण कृषी जीवनशैलीचा भाषीक, मनोवैज्ञानिक अभ्यास" (A Linguistic and Psychological Study of the Indian Economy and Rural Agriculture) हा प्रस्तुत उपघटक विषय निवडलेला आहे. यासाठी संदर्भ आधार, इंटरनेट आणि AI आधार घेतलेला आहे. विषयाचा विस्ताराबद्दल चर्चा खालील मुद्दें वरून केले आहे. या परिषदेला मनापासून भरपूर शुभेच्छा.

विषय विस्तार

1) जागतिक अर्थव्यवस्था: स्वरूप व महत्व:

“जागतिक स्तरावर होर्मूज सारख्या व्यवस्था, यंत्रणा आणि Suply Chain च्या माध्यमातून विविध देशांमध्ये आवश्यक पुरवठा, सुविधा,संशाधने उपलब्ध केली जातात.घरातील व्यक्तीस कोणत्याही प्रकारचे वस्तू सहज उपलब्ध झालेली असतात. त्या सदृश्य वस्तू पुरवठा साखळीच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आलेली असतात. अन्न वस्त्र निवारा आरोग्य शिक्षण आणि अलिकडे संगणक, मोबाईल व इतर आवश्यक जड अजड वस्तू वाहनं अजूनही आयात केले जातात.कच्चा तेल, गॅस आयात केले जाते. जागतिक स्तरावर युद्धजन्य परिणाम जाणवला.भारतीय अर्थव्यवस्था आणि जीवनशैलीवरही परिणाम जाणवला.परंतु या परिस्थितीत स्वतः ला सावरले आहे. जगात भारताचा गौरव होत आहे.”1

भारतीय अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थे सारखी Suply Chain मजबूत करण्यासाठी कटिबद्ध असणे आवश्यक आहे.श्रमस्य जयते राष्ट्र’ श्रमाने राष्ट्राचा विजय होतो. जागतिक अर्थव्यवस्था ही विविध क्षेत्रातील देशाला सहाय्य सुद्धा करत असते. त्यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेचे स्वरूप व महत्व अनन्यसाधारण आहे.

जागतिक अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी विशेष करून भारतानेही आयात बरोबर निर्यात करण्यावरून भर दिला पाहिजे.वेगवेगळ्या तर्हेचे उद्देश पूर्ण करण्यासाठी उद्योग व्यापार संशाधने निर्माण करून जगाच्या विविध भागांत पोहचविले पाहिजे. भारतीय कृषी जीवनशैलीचा अधिकाधिक विकास करून अन्नधान्य उत्पादन वितरण तथा निर्यात वाढवला पाहिजे. जगातील मानवांची अर्थव्यवस्था म्हणजे World Economy म्हणता येईल. जागतिक अर्थव्यवस्था ही एक प्रणाली आहे.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

ज्या माध्यमातून व्यवहार किंवा क्रियाकलाप चालत असतात. या संदर्भात "जागतिक अर्थव्यवस्था ही संज्ञा जगभरात होणा-या परस्परसंबंधित आर्थिक घडामोडी आणि देवाणघेवाणाला सूचित करते."2 यामध्ये सीमा, सेवांचे उत्पादन, व्यापार, उपभोगचा समावेश होतो. जो देश, व्यवसाय व ग्राहकांना जोडत असतात.अमेरिका, चीन, युरोपियन व्यवस्था, WTO, IMF, World Bank, Sez आदी काही उदाहरणे आहेत. ज्या पारंपरिक, नियंत्रित, बाजार आणि मिश्र स्वरूपात काम करतात. कोवीड-19 महामारी, 2026 मधील आखाती देशांतील स्थिती या व्यवस्थेवर परिणाम करणा-या ठरल्या आहेत. "जागतिक अर्थव्यवस्था म्हणजे जगातील सर्व देशांच्या अर्थव्यवस्थांची एकत्रित प्रणाली. यात वस्तू सेवा तंत्रज्ञान भांडवल आणि लोकांची आंतरराष्ट्रीय स्तरावर देवाणघेवाण होते."3

2) भारतीय अर्थव्यवस्था: स्वरूप व महत्व:

" प्राथमिक ते उच्च माध्यमिक शिक्षण घेत असताना शाळेमध्ये मुलांना पैशाची गरज समजून बचत करायला शिकवले जायचे. मी विद्यार्थी जीवनात हे अनुभव केले आहे. खाऊ साठी, लेखनीसाठी आईवडिलांकडून, पालकांकडून मिळालेले व स्वतः कमावलेल्या पैशाचे पुस्तके, ग्रंथ पेन वही सुद्धा खरेदी करायचे. सोबतच बचत पण करायचे. त्यासाठी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली वर्गात पैशाची बचत सुविधा उपलब्ध करुन दिले जायचे. विद्यार्थी समूह मिळून एक रुपया पासून बचत करत असायचे.महिन्यात ते तीस रूपये जमा व्हायचे.एका वर्गात पंचवीस ते पन्नास विद्यार्थी असायचे. सातशे ते पंधराशे अंदाजे कमीत कमी रूपये महिन्यात जमा व्हायचे. सर्वच मुले पैसे देत नव्हते. काहींचे शिक्षक तर काहींच्या नावाने विद्यार्थी पैसे द्यायचे. सर्व विद्यार्थी मिळून छान पैसा उभा राहिला.नंतर ते कुणाला उपयोगी पडायचे. कमीत कमी पैशातून एक व्यवस्था उभी राहायची. विद्यार्थी जीवनात मिळालेले आर्थिक साक्षरतेचे घर कुटुंब समाज समूह आणि देशात राबविल्याने आर्थिक साक्षरतेचे महत्व अधोरेखित होईल. देशातील अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी लहान लहान प्रयोग करणे, गाव नगरांनी मिळून हे कार्य करणे आवश्यक आहे.

"आज देशाची अर्थव्यवस्था झपाट्याने वाढत आहे.जगातील देशात भारताचे गौरव केले जात आहे. सम्मान होत आहे. ब्रीक्स 2026 सारख्या कार्यक्रमाचे नेतृत्व भारताच्या आदरणीय पंतप्रधान श्री नरेंद्रजी मोदी साहेब यांचे मार्गदर्शनाखाली केले आहे. राष्ट्र सेवा भाव घेऊन भारतीय अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी होत असलेले कार्य अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे. विकसित भारत 2047 च्या संकल्पाला गती प्राप्त होणार आहे. देशातील प्रत्येक क्षेत्र आणि घटकांचा विकास, परिवर्तन होत आहे. जगाने कौतुक करावे असे आधारभूत सुविधा संसाधने उपलब्ध करून देशाचे नेतृत्व विश्वास आणि विश्वामध्ये लोकप्रिय नेतृत्व आणि देश म्हणून ओळखला जात आहे. रेल्वे, रेल्वेमार्ग, रस्ते, जलमार्ग वस्तू निर्माण, विमानतळ, बसस्थानके,, शेतकरी महिला गरीब कल्याण युवा शक्तीला सम्मान आदि अनेक आदर्श विचारांवर चर्चा केली आहे.कार्य केले आहे. भारत सरकारच्या विविध नाविन्यपूर्ण धोरण-योजना उपक्रमामुळे अर्थव्यवस्था अधिक मजबूत होत आहे.वेळेचे नियोजन व व्यवस्थापन करण्यासाठी डिजीटल क्रांती, मेक ईन इंडिया, स्टार्ट इंडिया सारखे संकल्प नव्याने देशामध्ये भारतीय अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी प्रयत्नशील आहे. विश्वासाने आणि आपल्या योगदानामुळे भारतीय नागरिक हा आनंद व्यक्त करतो आहे. देशातील नागरिक देशासाठी सर्वसमावेशक भूमिका पार पाडत आहे.ही सकारात्मक बाजू देशाला लवकरच विकसित भारत, आत्मनिर्भर भारत म्हणून जगासमोर आणणार आहे. विविध क्षेत्र, प्रांत प्रदेशातून व्यापार वाढत आहे. या योगदानामुळे भारतीय अर्थव्यवस्था मजबूत होणार आहे. देशाला विकसित करण्यासाठी विद्यापीठे शैक्षणिक संस्था शिक्षक विद्यार्थी पालक, कृषी व्यवस्था, ग्रामीण कृषी जीवनशैली, उद्योग व्यापार सारख्या विविध प्रकारच्या व्यवस्था हातभार लावत आहेत.आजच्या घडीला वेळेचे योग्य नियोजन म्हणजे केवळ आर्थिक सक्षमीकरणच नाही तर उद्याच्या सुखी राष्ट्राचा मंत्र आहे. ग्रामीण कृषी जीवनशैलीचा उद्धार भारतीय अर्थव्यवस्थेचा उद्धार आहे. सामाजिक सांस्कृतिक, धार्मिक शैक्षणिक राजकीय साहित्यिक भाषीक वाङ्मयीन कलात्मक वैज्ञानिक आध्यात्मिक मनोवैज्ञानिक आदि अनेक घटक आणि क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी, वारसा जपणे आवश्यक आहे."4

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

3) भारतीय अर्थव्यवस्था आणि ग्रामीण जीवनशैली:-

घनश्याम सुंदरा श्रीधरा'ही लोकप्रिय भुपाळी होनाजी बाळाची आहे. ग्रामीण जीवनशैलीचा सुंदर आविष्कार आहे.सकाळी ब्रम्हमूहूर्त ते शिवारात जाईपर्यंतच्या जनजीवनावर अत्यंत सुंदर पद्धतीने या भूपाळीमध्ये प्रकाश टाकला आहे. मोठी नगरे आणि ग्रामीण जीवनशैली सुध्दा अगदी सकाळी ते संध्याकाळी, भर रात्रीला सुद्धा भूमिका पार पाडत असते. गाव घर कुटुंब समाज व्यक्ती माणसं समूह मिळून गाव बनलेला असतो.शेती हा प्रमुख व्यवसाय असला तरी शेती सोबतीला ईतर जीवनावश्यक व्यवसाय उभे असतात.पशुपालन, पाळीव प्राणी म्हणून गाय बैल बकरी मेंढी म्हैस कोंबड्या, कुक्कुटपालन, मधुमक्षिका पालन केले जातात. विविध पूरक व्यवसाय म्हणून अलुतेदारी बलुतेदारी चालू आहे. सण उत्सव,रूढी परंपरा आणि आधुनिकता वैज्ञानिक आध्यात्मिक दृष्टीकोन, कला साहित्य संस्कृतीचे दर्शन ग्रामीण कृषी जीवनशैलीचा अविभाज्य अंग आहे. व्यक्ती व्यक्ती समूदायाच्या माध्यमातून ग्रामीण जीवनशैलीचे दर्शन घडते.शेतीमध्ये विविध पारंपरिक आधुनिक प्रयोग केले जात आहे.

पारंपरिक पिके घेतली जात आहे.कापूस सोयाबीन तूर मूग उडीद तीळ भुईमूग ज्वारी बाजरी मका भाजीपाला चारापीक घेतले जात आहे.विविध आवश्यक वृक्ष लागवड वनौषधींची लागवड, मसाल्याची शेती, लाकुड व इंधन,फळे वर्गीय झाडांना लावणे, उगवलेल्या वनस्पती वृक्षाला जपणे आदि कार्य ग्रामीण भागातील जीवनशैलीचा अत्यंत अभ्यासपूर्ण विचार आहे. अजुनही भारतीय संस्कृतीचे दर्शन ग्रामीण कृषी जीवनशैलीमध्ये अनुभवायला मिळत आहे.लोकसाहित्य, लोककला लोकपरंपरा जपली जात आहे. "ग्रामीण कृषी जीवनशैलीमध्ये विविध हंगामातील सुगी ही आर्थिक ओळख आहे.खरीप रब्बी आणि उन्हाळी हंगाम या तिन्ही हंगामात सुगीचे विशेष महत्त्व आहे.एक वेगळीच मजा बघायला मिळते. शेतकरी पिकांचा हिरवा रंग बघून आनंदी होतो.तर सुगीचा आनंद ही असतो.विविध व्यवस्थापन जसे की सकाळी उठल्यापासून ते रात्री विराम पर्यंतची दिनचर्या ग्रामीण कृषी जीवनशैलीचा अभिन्न अंग आहे. प्रत्येक व्यक्ती महत्त्वाचा आहे. प्रत्येक व्यक्ती भरपूर मेहनत करून उदरनिर्वाह करत आहे. गावाला, कृषी जीवनाला समृद्ध बनविण्यासाठी,देशाला विकसित करण्यासाठी ग्रामीण कृषी जीवनशैलीचा उद्धार आवश्यक आहे."5

4) भारतीय अर्थव्यवस्था आणि ग्रामीण कृषी जीवनशैलीचा भाषीक, मनोवैज्ञानिक अभ्यास:

ग्रामीण कृषी जीवन पद्धती ऐवजी कृषी जीवनशैली भाषीक मनोवैज्ञानिक हा शब्द मी वापरलेला आहे. याचा अर्थ असा आहे की मानवता आणि मानवनिर्मित अस्तित्वाला विविध सुख दुःखाचे वलय असतात. या वलयाला सुख दुःख नाव दिले आहे.जलमाचे सुख मृत्यूचे दुःख प्रत्येकाला आहे. त्यामुळे ही जीवनपद्धती ग्रामीण भागातील जीवनशैली बनते. कृषी जीवनावर आधारित असल्याने कृषी जीवनशैली ठरते. शैली अर्थात भाषा, भाषा मग बोलींची विविधता, शैली अर्थात आचरणातून आलेली विविधता हे ग्रामीण कृषी जीवनामध्ये अनुभवायला मिळते. म्हणून ग्रामीण जीवनशैली असा शब्द प्रयोग केला आहे. मग दुसरा शब्द उरतो तो म्हणजे मनोवैज्ञानिक तर ग्रामीण कृषी जीवनशैली ही निसर्गावर, वातावरण हवामान पर्यावरणावर, देवी देवतांची स्तुती प्रार्थना उपासनेवर आधारलेली असते. श्रमावरही आधारित असते. "शेतीमध्ये विविध प्रयोग केले जातात. सुगी हंगाम येते जाते. परंतु ग्रामीण कृषी जीवनशैलीचा कुठेतरी काहीतरी विसर पडलेला असतो. भगवंताचे, आराध्याचे स्मरण करून, भरपूर मेहनत करून ही निसर्ग वेळीच पाऊस येत नाही. त्यावेळी पावसासाठी शिळाक' बांधले जाते.(आजच्या भाषेत पावसाचा अंदाज बांधणे) पावसासाठी धोंडी मागितली जाते. धोंडी धोंडी पाणी दे (धोंड्य धोंड्या पाणी दे रे) ही लोकप्रचुर वाक्प्रचारता भाषीक,भाषा ठरते. जी मनोवैज्ञानिक दृष्टीने अभ्यास ठरते. काही ठिकाणी निसर्ग देवी देवतांची पुजा सुद्धा केली जाते. हे सर्व संदर्भ व प्रक्रिया श्रद्धा आस्था ठरते. कधी इतका पाऊस पडतो की भरपूर. ही अनिश्चितता मनाला (मनोवैज्ञानिक) वेगवेगळ्या प्रकारच्या आयाम प्राप्त करून द्यायला मदत करीत असते. म्हणजेच प्रत्येक क्रिया ही भाषीक मनोवैज्ञानिक दृष्टीने अभ्यासपूर्ण ठरते. जसे जसे आपण ग्रामीण जीवनशैलीचा अभ्यास करू विषय अधिक सखोल होत जातो. त्यामुळे विषयाची

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

शब्द मर्यादा जाणून ग्रामीण कृषी जीवनशैलीचा भाषीक मनोवैज्ञानिक अभ्यास हा शब्द वापरला आहे."6 या संदर्भात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामगीतेतील काही ओळी उद्धृत करतो- " शहरी गेली गावची बुद्धी! शहरी गेली गावची समृद्धी ! कष्टाळू शक्ती, हस्तकला सिद्धी! तेही गेली! जीवनात यावा सरळपणा! साधा सात्विकतेचा बाणा! हृदय निर्मळतेचा निशाणा! कलावंताचा धर्म हा!"7 प्रस्तुत विचार शोधनिबंधाच्या विषयासंदर्भात विस्ताराने चर्चा ठरते.

निष्कर्ष:

1) विश्वाच्या कल्याणासाठी अर्थ महत्वाचा आहे.अर्थ केवळ पैसा नाही. अर्थ म्हणजे वेळेचे नियोजन आहे. जगाच्या पाठीवर अनेक विकसित देश आहे. त्याहून अधिक पटीने विकसनशील देश आहे. वेळेचे नियोजन करून अर्थ प्राप्त केले जात असेल तो देश विकसित होतो.

2) विश्व कल्याणासाठी जागतिक अर्थव्यवस्था महत्वाची भूमिका बजावत आहे. विकसनशील देशांसाठी ही अर्थव्यवस्था अत्यंत आवश्यक आहे. जागतिक स्तरावर आर्थिक दृष्टीने सक्षम होण्यासाठी अर्थविषयक विचार, मार्गदर्शन महत्वपूर्ण ठरतात. त्यासाठी विविध आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय परिषद आयोजित केले जात असेल तर ते नक्कीच स्वागतार्ह आहे.

3) भारताच्या कल्याणासाठी ही सर्वसमावेशक देशाची अर्थव्यवस्था समजून घेण्यासाठी भक्कम आधार आहे.

4) भारत हा कृषिप्रधान देश आहे. विकसित देशांत भारताचे नाव सुवर्णाक्षरांनी लिहिले जाणार आहे. 'विकसित भारत 2047' हा संकल्प भारताचा सर्वहिताय सर्वसुखाय प्रेरणा देणारा आहे.

5) भारत हा कृषिप्रधान देश आहे.या वाक्याचा प्राथमिक शिक्षणापासून भाषेतून मनोवैज्ञानिक दृष्टीने अभ्यास करत आलो आहे.

6) कृषी जीवनशैली ग्रामीण जीवनाचा आनंद आणि आधार आहे.भारतीय अर्थव्यवस्था समृद्ध करण्याचा पाया आहे. ग्रामीण कृषी जीवनशैलीचा सुंदर आविष्कार आहे. लाखों लाखों गावं मिळून मजबूत भारत बनलेला आहे.

7) जगातील सर्वात जास्त युवा देश म्हणून भारत ओळखला जातो. देशाला विकसित करण्यासाठी कटिबद्ध आहे.

संदर्भ आधार

1)प्रा मनोज चव्हाण, वैचारिक लेखन, सप्टेंबर 2026.

2)Trade Atlas, AI, जागतिक अर्थव्यवस्था, मार्च 2021.

3)Uttar.Com, व्याख्या, मार्च 2025.

4)प्रा मनोज चव्हाण, वैचारिक लेखन सप्टेंबर 2026.

5)प्रा मनोज चव्हाण, ललित लेखन, सप्टेंबर 2026

6) प्रा मनोज चव्हाण, मनोवैज्ञानिक लेखन, वर्षे सप्टेंबर 2026.

7) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, ग्रामगीता, पुणे, वर्षे 2016.